“मराठी मंडळ सॅक्रामेंटो”चे त्रैमासिक

# अभिरुची




- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक व मंडळाकडे राहतील.

# २०२०-२०२१ अंक #१


- संपादकीय — हिमानी कुलकर्णी
- अध्यक्षीय — संदीप बिडये
- मनातले काही... — उमेश जाधव
- कार्यकारिणी ओळख
  - अध्यक्ष — संदीप बिडये
  - सचिव — उमेश जाधव
  - खजिनदार — सतिश आडेट्टीवार
  - सहसचिव — भगवती उपाध्ये
  - सहखजिनदार — सुजय रणदिवे
- हृदयावर कोरले गेलेले ठसे — स्मिता कुलकर्णी
- आयुष्यं ! — प्रीती देशपांडे
- आभार — अमिता खरे
- कविता: तिमिरातूनी तेजाकडे — हिमानी कुलकर्णी
- सामान्यतः विचारले जाणारे प्रश्न (FAQs ) — कार्यकारिणी
- उर्वरित कार्यक्रम कॅलेंडर — कार्यकारिणी

# संपादकीय

नमस्कार मंडळी,

सर्वप्रथम तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा !!. नवीन वर्षातील पहिली तिमाही संपली आणि 'अभिरुची' प्रकाशित करण्याची वेळ बघता बघता येऊन ठेपली. २०२०-२०२१ वर्षातील "अभिरुची" चा हा पहिला अंक आज तुमच्या हातात देत आहे.

तुम्हाला नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या खऱ्या पण हे वर्ष सुरु होतानाच आपल्यासमोर एक अकल्पित आव्हान घेऊन आलं आहे. कोरोना व्हायरस मुळे होणाऱ्या कोविड -१९ या रोगाच्या जगभरातील उद्रेकाने आपणा सर्वांनाच सुन्न करून टाकलं आहे.त्याबद्दल माझ्या भावना व्यक्त केल्याशिवाय मला राहवणार नाही. जागतिक आरोग्य संघटनेने "ग्लोबल पँडेमिक" म्हणून जाहीर केलेलं हे संकट खरोखर अभूतपूर्व असंच आहे. भल्या भल्या महासत्ता आज या संकटापुढे हतबल आहेत. इतकंच नाही तर या आपत्तीमुळे आपल्या सर्वांची आयुष्यं खूपच बदलून गेली आहेत. सामाजिक अंतर म्हणजेच सोशल डिस्टन्स ठेवून जगणे आपल्यासाठी अगदी नवीन आहे. मुळातच समाजशील असलेल्या मनुष्याला ही जगण्याची पद्धत पचनी पडायला वेळ तर लागेलच! पण सध्या तरी हा रोग थोपवण्याचा सोशल डिस्टंसिन्ग हाच एक उपाय आहे. आपल्यापैकी अनेकजण घरून काम करत आहेत. पण आपल्या आजूबाजूला अत्यावश्यक सेवा पुरवणारे म्हणजेच आरोग्य क्षेत्रात काम करणारे डॉक्टर्स ,नर्सेस, ग्रोसरी स्टोअर्स मध्ये काम करणारे , डिलिव्हरी देणारे असे अनेक जण आपलं चार भिंतीतलं आयुष्य सुरळीत चालू रहावं म्हणून वैयक्तिक सुरक्षेचा विचार न करता अखंड सेवा पुरवत आहेत. या सर्वांच्या कर्तव्यतत्परतेला आणि त्यागाला मनापासून वंदन ! या वर्गात न मोडणारे उरलेले आपण सर्व काय करू शकतो ? सर्वात महत्वाचे म्हणजे शक्य तितके घरी राहून, स्वतःच्या आरोग्याची काळजी घेऊन आणि बाहेर जावेच लागेल तेव्हा सोशल डिस्टंसिनाच्या सर्व नियमांचे पालन करून आपण व्यवस्थेवरचा आणि पर्यायाने अत्यावश्यक सेवा पुरवणाऱ्या या वर्गावरचा ताण कमी करू शकतो. ही सर्व काळजी तुम्ही यथाशक्ती घेतच असाल अशी खात्री आहे.

पण मंडळी, याहूनही एक मोठा प्रश्न असा आहे कि आपली सामाजिक जबाबदारी इथेच संपते का ? माणूस म्हणून उत्क्रांतीच्या सर्वोच्च शिखरावर आहोत असे आपण म्हणतो मग आपल्या जबाबदारीत आपण कुठे कमी पडलो म्हणून आज आपल्यावर ही वेळ आली? सगळीकडे लॉकडाऊन झाल्यापासून निसर्गातील अनेक चांगल्या बदलांबाबतच्या बातम्या आपण ऐकत आहोत. हवा आणि पाणी स्वच्छ होत आहे, प्राणी पक्षी निर्भय होऊन फिरत आहेत. ऋतुचक्र नेहमीसारखेच अविरत चालू आहे. पण निसर्गाने लावलेल्या या छोट्याशा ब्रेकमुळे आपल्या तथाकथित वेगवान आणि प्रगतिशील आयुष्यात मात्र हाहाकार माजला आहे. एकूणच आजूबाजूचा निसर्ग स्वतःला पुनरुज्जीवित करत आहे असे दिसते आहे. हा निसर्ग आपल्याला काही संदेश देत असावा का ? निसर्ग आपल्यामुळे नाही तर आपण निसर्गामुळे आहोत असं सांगून आपल्याला झोपेतून खडबडून जागे करण्याचा हा त्याचा प्रयत्न असावा. निसर्गापासून दूर जाऊन कृत्रिम जीवन जगणाऱ्या, सतत धावत असणाऱ्या माणसाला थोडं थांबून अंतर्मुख व्हायला भाग पाडायचा हा एकच उपाय उरला असावा. यातून बोध घेऊन आपण निसर्गाशी मैत्रीपूर्ण अशी जीवनशैली स्वीकारण्याची गरज आहे. झाडे आणि पशुपक्षांची अनिर्बंध हानी करणं थांबवूया. ह्या सर्वांशी आपण संसाधने वाटून घेतो आहोत हे भान ठेवूया. हवा आणि जलस्रोत प्रदूषित करणे थांबवूया. प्लास्टिकसारख्या अविघटनशील गोष्टींचा वापर कमीत कमी करूया. थोडक्यात काय तर निसर्गावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न न करता त्याच्याशी तादात्म्य पावून जगूया. असो, जगात चाललेल्या या उलथापालथीमुळे माझ्या मनात चाललेली उलथापालथ तुमच्यासोबत वाटून घ्यावी असं वाटलं म्हणून हा लेखनप्रपंच!.

तर मंडळी, अशा या अद्वितीय २०२० वर्षांत आपली नवीन कार्यकारिणी सर्व आव्हाने पेलण्यासाठी तयार आहे बरं का! अचानक उद्भवलेल्या या परिस्थितीमुळे काही पूर्वनियोजित कार्यक्रम वेळापत्रकानुसार होऊ शकले नसले तरी कार्यकारिणीचे मनोबल मात्र कायम आहे. ह्या अंकात आपल्या कार्यकारिणी सदस्यांनी तुमच्याशी काही मनमोकळी हितगुज केली आहे. "अध्यक्षीय" मधून आपले नवनिर्वाचित अध्यक्ष संदीप बिडये त्यांचं मनोगत व्यक्त करत आहेत. कोरोना परिस्थितीमुळे कार्यकारिणी हे वर्ष कसे हाताळेल, कार्यक्रम कसे पार पडतील हे आणि असे काही प्रश्न तुमच्या मनात असणे साहजिक आहे. त्याबद्दल सचिव उमेश जाधव ह्यांनी त्यांचं मनोगत व्यक्त केलं आहे "मनातले काही .." या छोटेखानी लेखात. त्याचबरोबर अंकाच्या शेवटी सामान्यतः विचारल्या जाणाऱ्या काही प्रश्नांची उत्तरे कार्यकारिणीने दिली आहेत, ती जरूर वाचा . कार्यकारिणी ओळख सदरात पुन्हा एकदा अध्यक्ष संदीप बिडये, सचिव उमेश जाधव , सहसचिव भगवती उपाध्ये , खजिनदार सतीश आडेट्टीवार आणि सहखजिनदार सुजय रणदिवे या सर्वांनी त्यांच्या खास लेखनशैलीत आपली ओळख करून दिली आहे. कार्यकारिणी सदस्यांच्या नर्मविनोदी लेखनशैलीवरून तुम्हाला त्यांच्या रसिकतेची कल्पना नक्कीच येईल.

कुत्रा हा जगातला सर्वात जास्त माणसाळलेला प्राणी आहे असं म्हणतात. कुत्रा म्हंटलं कि आठवते ती त्याची स्वामीनिष्ठा आणि निरपेक्ष प्रेम. अभिरुचीच्या नियमित लेखिका स्मिता कुलकर्णी यांनी "हृदयावर कोरले गेलेले ठसे" या लेखात पाळीव कुत्र्यांसोबत असलेल्या त्यांच्या अनोख्या नात्याबद्दल लिहिलं आहे. लेखिकेच्या नेहमीच्या रंजक शैलीतील हा लेख तुम्हाला नक्की आवडेल.

आत्ता लॉकडाऊन मध्ये आपल्याला प्रवास करायला बंदी आहे पण म्हणून आपलं मन काही प्रवास करायचं थांबत नाही. ते कधी भविष्याच्या स्वप्नात गुंगून जातं तर कधी आठवणींच्या प्रदेशात मुक्त भटकंती करतं. मनाच्या या भटकंतीला आवरणं म्हणजे महाकठीण काम. म्हणून तर बहिणाबाई म्हणतात "मन पाखरू पाखरू त्याची काय सांगू मात, आता व्हतं भुईवर गेलं गेलं आभायात" . असं मन आठवणीत रमून गेलं कि कधी त्या हळव्या कोपऱ्याशी जाऊन पोहोचतं तेच समजत नाही. मग वास्तवाची एखादी झुळूक त्या मनाला भुर्र्कन उडवून वर्तमानात आणते. असाच एक हळवा अनुभव वाचा प्रीती देशपांडे लिखित "आयुष्यं" या लेखात.

आजच्या परिस्थितीत जर आपल्याला एका कुठल्या भावनेची सर्वात जास्त जाणीव झाली असेल तर ती भावना म्हणजे 'कृतज्ञता' . रोजच्या आयुष्यात अगदी साध्या साध्या कितीतरी गोष्टी आपण गृहीत धरत होतो ज्या आज फार दुर्मिळ झाल्या आहेत. या कोरोनाने शिकवलेली अजून एक गोष्ट म्हणजे छोट्या छोट्या गोष्टीत लपलेला आनंद शोधण्याची आणि त्याबद्दल कृतज्ञ राहण्याची कला. "आभार" या ललितपुष्पात लेखिका अमिता खरे यांनी ही भावना अगदी मोजक्या शब्दांत पण सुरेख व्यक्त केली आहे.

भारतात कोरोना विरुद्धच्या युद्धात विजयश्री मिळावी म्हणून दीपप्रज्वलन करून सामूहिक प्रार्थना केली गेली. खरं तर कविता हा माझा प्रांत नाही पण भारतातील दीपप्रज्वलनाची दृश्ये पाहून मनात एक प्रकारची अनन्यता दाटून आली आणि त्यातून कवितेच्या काही ओळी सुचल्या. हा अनन्यभाव "तिमिरातूनी तेजाकडे" ह्या कवितेत व्यक्त करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

संपादकीय संपवायच्या आधी एका विशेष व्यक्तीचा उल्लेख करायचा आहे. या वर्षी अभिरुचीसाठी मला एक खूप छान मदतनीस आणि मैत्रीण मिळाली आहे. ती व्यक्ती म्हणजे प्राची जेजुरीकर. हा अंक प्रूफरीड आणि संकलित करण्यासाठी प्राचीची खूप मदत झाली आहे त्याबद्दल तिचे मनापासून आभार. आणि प्राचीसारखी मेहनती टीम-मेट शोधून दिल्याबद्दल अध्यक्ष संदीप बिडये यांचेही आभार.

आपला हा अभिरुचीचा अंक प्रेम, अनन्यता , कृतज्ञता आणि त्याचबरोबर नर्मविनोद अशा विविध रसांनी परिपूर्ण झाला आहे. तुम्हाला आवडेल अशी अशा आहे. तुमच्या प्रतिक्रिया नक्की कळवा. पुढील अभिरुची अंकासाठी एक थीम विचारात आहे " निसर्गाशी जडले नाते ". यात तुम्ही व्यक्त करू शकता तुमचं निसर्गाशी असलेलं नातं मग ते तुमच्या बागकामाच्या आवडीतून दिसेल , टाकाऊपासून टिकाऊ गोष्टी बनवण्यात दिसेल, ट्रेकिंग/हायकिंगच्या आवडीमध्ये दिसेल किंवा आणखी काही छंद/अनुभव जे तुम्हाला निसर्गाच्या जवळ नेतात. ही थीम ठेवण्यामागचा उद्देश एवढाच कि जसे आपण या कोरोना नामक संकटातून हळू हळू बाहेर पडू, तसे पुन्हा निसर्गापासून दूर जाऊ नये. एक खूप छान विचार वाचनात आला होता " "In the rush to return to 'normal,' use this time to consider which parts of normal are worth rushing back to." . तुम्ही हाच धागा पकडून लिहा पुढच्या अंकासाठी. ह्या थीम व्यतिरिक्त इतर विषयांवरही लेख /कविता/अनुभव कथन /कलाकृती नक्कीच स्वागतार्ह आहेत. तुमचं साहित्य १५ जुलै पर्यंत माझ्या ई -मेल वर (contact2himani@gmail.com) पाठवून द्या.

मंडळी, हा अनिश्चिततेचा काळ लवकरात लवकर सरून जाईल अशी प्रार्थना करूया आणि तोपर्यंत संयमाने या संकटाला तोंड देऊया. तुम्हा सर्वांसाठी उत्तम आरोग्याची कामना करून संपादकीय संपवते. काळजी घ्या आणि सुरक्षित रहा.

आपली स्नेहांकित,



**-हिमानी कुलकर्णी**

**(संपादक, अभिरुची - मराठी मंडळ सॅक्रामेंटो )**

# अध्यक्षीय

नमस्कार मंडळी,

अभिरुचीचा हा अंक ह्या वर्षातील पहिलाच अंक असल्याने, सर्वप्रथम २०२०-२१ च्या नवीन कार्यकारिणीकडून आपण सर्वांना नववर्षाच्या मन:पूर्वक शुभेच्छा. सालाबादप्रमाणे जानेवारी महिन्यात झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत, १ फेब्रुवारी २०२० ते ३१ जानेवारी २०२१ ह्या कालावधीसाठी हि नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली. मागच्या वर्षी महाराष्ट्र राज्यात झालेल्या निवडणुकीसारखे नाट्य ह्या निवडणुकीत नव्हते, त्यामुळे आम्हाला रात्री अपरात्री शपथविधी घेण्याची संधी मिळाली नाही. असो, तर ह्या निवडीनुसार मी संदीप बिडये (अध्यक्ष), उमेश जाधव (सचिव), सतिश आडेट्टीवार (खजिनदार), सुजय रणदिवे (सह-खजिनदार) आणि भगवती उपाध्ये (सह-सचिव) यांनी मुख्य कार्यकारिणीचा पदभार स्वीकारला. मला खात्री आहे कि आपण ह्या सर्वांना पुरते ओळखून असालच पण तरीही मुख्य कार्यकारिणीचा परिचय ह्या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे जेणेकरून तुम्हा सर्वांना आमची नव्याने ओळख व्हावी.

आम्हाला साथ द्यायला विनायक पाटील ( हिशेब-तपासनीस / ऑडिटर), अक्षज जोशी व सिया जोशी (युवा प्रतिनिधि), हिमानी कुलकर्णी (अभिरुची संपादिका), प्राची जेजुरीकर (अभिरुची मदतनीस), मीनल जोशी (BMM व IAS प्रतिनिधी), अमोल जोशी (फेसबुक अपडेट्स), विक्रम बोबडे व पल्लवी सावंत (मराठी शाळा समन्वयक), प्रसन्नलक्ष्मी बिडये (वेबमास्टर), आणि संदेश मालपुरे (प्रायोजकत्व व्यवस्थापन)हि मंडळी सुद्धा आहेत.

नवीन कार्यकारिणीच्या यशस्वी सुरुवातीसाठी गरज असते ती मागील कार्यकारिणीच्या सहकार्याची आणि आम्हाला ह्या हस्तांतरणात २०१९-२० च्या कार्यकारणीने प्रचंड मदत केली. २०१९-२० कार्यकारिणीचे पदाधिकारी अजित नातू (अध्यक्ष), अमोल जोशी (सचिव), रसिका कुळे (खजिनदार), नमिता वरेकर (सह-खजिनदार) यांचे आम्ही विशेष आभार मानतो आणि आमच्या यापुढील वाटचालीत देखील त्यांचे सहकार्य असेच लाभत राहील अशी आशा बाळगतो.

कोणत्याही मंडळाच्या कार्यकारिणीला साथ देण्यासाठी बरेच मदतीचे हात लागतात आणि ते म्हणजे प्रत्येक कार्यक्रमात आपुलकीने झटणारे आपले स्वयंसेवक, वेळोवेळी मदत करणारे देणगीदार, मंडळाचे प्रायोजक, कार्यक्रमांत सहभागी होणारे हरहुन्नरी कलाकार, आणि ह्या सर्वांना प्रोत्साहन देणारे आपण सर्व सभासद. हे सर्व मदतीचे हात ह्याही वर्षी आमच्या बरोबर असतील अशी आमची खात्री आहे. ह्या शिवाय, सर्व कार्यकारिणीतील सभासद आणि स्वयंसेवक यांच्या कुटुंबियांचे विशेष आभार कारण त्यांच्या पाठींब्याशिवाय मंडळासाठी एवढा वेळ देणे शक्य नाही.

मंडळी, ह्या वर्षी आमच्या कार्यकारिणीने पदभार स्वीकारल्या नंतर एकंदर आयोजनाचा आढावा घेतला आणि काही नवीन संकल्पना राबवण्याचा निर्णय घेतला. बर्याचदा ह्या संकल्पनांमागील हेतू सर्वांपर्यंत व्यवस्थित पोहोचत नाही आणि म्हणूनच काही महत्वाच्या संकल्पनामागील हेतू पोहचवण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न.

- सुधारीत सभासदत्व शुल्क ( revised membership fee) -
आपणा सर्वांस माहिती असेलच कि सगळी सोंगे घेता येतात पण पैशाचे सोंग घेता येत नाही आणि मंडळाचे नियोजित कार्यक्रम चालू ठेवण्यासाठी कार्यकारिणीला प्रत्येक कार्यक्रमाआधी आर्थिक जुळवाजुळव करावी लागते. हा ताण प्रत्येक वर्षी कार्यकारिणीला सहन करावा लागतो. हे सुधारित सभासदत्व शुल्क ह्याच हेतूने ठरवले आहे कि हा ताण कमी होऊन कार्यकारिणी आपली सर्व ऊर्जा तुम्हा सर्वांना चांगले कार्यक्रम देण्यासाठी लावेल. तसेच हे सभासदत्व शुल्क, सर्व मागील वर्षांचा जमाखर्च बघूनच ठरवण्यात आले आहे. आता ह्या वाढीव शुल्कामुळे आपणास जर प्रश्न पडला असेल कि "कार्यकारिणीचे डोके ठिकाणावर आहे काय?" तर दुर्दैवाने त्याचे उत्तर मिळणार नाही, मात्र "सभासदत्वाचे फायदे काय?" ह्या प्रश्नाचे उत्तर आम्ही आमच्या FAQ मध्ये दिले आहे आणि ह्या अंकात देखील तो FAQ प्रसिद्ध करत आहोत. इतरही बऱ्याच प्रश्नांची उत्तरे ह्या FAQ मध्ये आपणास मिळतील. त्यामुळे आपण सर्वांना नम्र विनंती आहे कि हा FAQ एकदा वाचावा आणि तरीही काही अनुत्तरित प्रश्न असतील तर कार्यकारिणीकडे संपर्क साधावा.

- वरिष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि मुलांना मोफत प्रवेश -
मंडळाच्या कार्यक्रमांत विविध वयोगटातील सर्वसमावेशकता वाढवण्यासाठीच विद्यार्थी, वरिष्ठ नागरिक, मुले ह्यांना मोफत प्रवेश

देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच ह्या कल्पनेचा आर्थिक ताण मंडळावर पडणार नाही ह्या दृष्टिनेच सुधारीत शुल्क ठरविले आहे. त्या व्यतिरिक्त वरिष्ठ नागरिकांसाठी कार्यक्रम, युवा प्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली स्पोर्ट्स डे असे कार्यक्रम देखील ह्याच समावेशकतेच्या दृष्टीने ठरवले आहेत.

- विस्तारित कुटुंब -
आपले मंडळ हे एक विस्तारित कुटुंबच असल्याने ही कार्यकारिणी त्याबाबत सदैव जागरूक राहण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. त्या दृष्टीनेच मंडळातील सभासदांच्या सुखदुःखात एका कुटुंबाप्रमाणेच सहभागी होण्याचा प्रयत्न करणार आहे.

आता ह्या संकल्पनांचे प्रयोग यशस्वी करण्यासाठी ही कार्यकारिणी आपले १०० टक्के योगदान देणार हे नक्की मात्र त्याच बरोबर आपल्या सर्वांचे पाठबळ आणि मार्गदर्शन देखील तितकेच जरुरी आहे. आपण मंडळाचे सभासदत्व घेऊन आमच्या नवीन संकल्पनांचे जे स्वागत केले आहे त्याबद्दल मंडळ आपले खरंच खूप आभारी आहे आणि असाच पाठिंबा वर्षानुवर्षे सर्व कार्यकारिणींना मिळत राहील हीच अपेक्षा.

खरंतर ह्या अंकात आम्हाला रंगपंचमी आणि स्पोर्ट्स डे ह्या कार्यक्रमांमधील तुमच्या प्रतिसादाबद्दल सांगायला आवडले असते पण दुर्दैवाने सध्याच्या कोरोना परिस्थितीमुळे आपल्याला हे दोन्ही कार्यक्रम पुढे ढकलावे लागले आहेत. ह्या अंकासोबत कार्यक्रमांचे कॅलेंडर सादर करीत असलो तरी जोपर्यंत कोरोनच्या परिस्थितीत बदल होत नाही तोपर्यंत नाईलाजाने पुढील कार्यक्रमांबद्दल काही ठोस घोषणाही करू शकत नाही. ही गोष्ट आमच्यासाठी थोडी निराशजनक असली तरीही कार्यकारिणी ह्या सर्व परिस्थितीचे निरीक्षण करत आहे. आपले पालक बृहन महाराष्ट्र मंडळ (BMM ) यांच्या सोबत ह्या परिस्थितीसाठी जी काही मदत करता येईल ते करण्याचा प्रयत्न करत आहे. हो, तोपर्यंत आमच्या ह्या विस्तारित कुटुंबासाठी एकच विनंती "घरी राहा, स्वतःची काळज़ी घ्या, आपल्याला कोणत्याही मदतीची गरज असल्यास मंडळाकडे संपर्क साधा. आपण सर्व स्वतःची काळजी घेऊनच ह्या संकटावर मात करू शकतो, आणि एकदा हे संकट टळल्यावर भेटूच कि मंडळाचा कार्यक्रम साजरा करायला."

अभिरुची संपादिका हिमानी कुलकर्णी ह्यांनी ह्या पहिल्या अंकात मला आपले मनोगत व्यक्त करायला संधी दिली ह्याबद्दल त्यांचे आभार. आपण हा अंक संपूर्ण वाचाल आणि आपल्या सूचना आमच्या पर्यंत नक्कीच पोहोचवाल अशी अपेक्षा करतो. शेवटी, सध्याच्या कोरोना सारख्या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी लागणारा आशावाद दाखवणाऱ्या सुरेश भटांच्या चार ओळींनी माझ्या लेखाचा शेवट करतो,

विझलो आज जरी मी,
हा माझा अंत नाही....
पेटेन उद्या नव्याने,
हे सामर्थ्य नाशवंत नाही...!!!
- कवी सुरेश भट

आपला नम्र,



**-संदीप बिडये**
**अध्यक्ष मराठी मंडळ सॅक्रमेंटो २०२०-२१**

# मनातले काही...

कधी जाणार हे कोरोनाचं ग्रहण? पुन्हा कधी आपण सगळे परत भेटणार? यावर्षी आपले कार्यक्रम होणार कि नाहीत? हसरे चेहरे एकत्र कधी भेटणार? आणि आम्ही दिलेल्या "मेम्बरशिप फी" चे काय? असे बरेच विचार सगळयांच्या मनात येणं साहजिकच आहे. आमच्या मनात पण आहेत.

सर्व प्रथम, जसं आपण होळी आणि स्पोर्ट्स डे हे कार्यक्रम पुढे ढकलले, तसेच, पुढचे कार्यक्रमसुद्धा त्याच प्रकारे, त्या वेळेचा आढावा घेत ठरवतं जाऊ. अर्थात तुम्हाला सगळ्यांना वेळोवेळी कळवत जाऊच. तुमची दिलेली मेम्बरशिप फी, स्पॉन्सरशिप / देणगी, आम्ही जपून ठेवली आहे. तसेच या वर्षी आम्ही स्टोरेजचा वापर आणि त्याला होणारा खर्च यांचा आढावा घेऊन, स्टोरेजचा वापर बंद करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मंडळाच्या खर्चात थोडी बचत झाली आहे. आम्ही खरंच मनापासून जे जे प्रोग्रॅम करता येतील ते करू आणि **समजा या वर्षी एकही प्रोग्रॅम करू शकलो नाही तर तुमची मेम्बरशिप तशीच्या तशी पुढच्या वर्षासाठी लागू होईल**.

जर हे कोरोनाचं ग्रहण जास्तच लांबत गेलं तर काही प्रोग्रॅम्स आधुनिक तंत्रज्ञाचा वापर करून करायचा प्रयत्न करू.

परत लवकर भेटूच. तो पर्यंत स्वतःची आणि सहपरिवाराची काळजी घ्या. नियमाने व्यायाम करा आणि प्रोग्रॅम्स ची तयारी करा !!!

आपला नम्र,



**-उमेश जाधव**
**सचिव २०२०-२१**

# कार्यकारिणी ओळख : अध्यक्ष

नमस्कार मंडळी ,

मी संदीप बिडये, रॉकलीन ह्या छोट्याशा गावात पत्नी प्रसन्नालक्ष्मी, ३ मुलं (आर्यन, अर्णव, आदित्य) आणि २ कोंबड्या यांसोबत राहतो. मी Hewlett Packard Enterprise मध्ये इंजिनीअर म्हणून काम करतो, म्हणजे कागदोपत्री तसा पुरावा असल्याने बोलायचे काम करतो म्हणून.

मी जन्मापासून मुंबईकर असलो तरी तसे माझे मुळगाव शेळपी, हे कोकणातील निसर्गरम्य अशा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळपासून तासाभराच्या अंतरावर आहे. कोकणाचा कॅलिफोर्निया करणारी टॅगलाईन राजकारणी प्रसिद्ध करत असतानाच, मी मात्र २००१ मध्ये मुंबईतील जगप्रसिद्ध काळाचौकी ह्या भागातून कॅलिफोर्नियातील सॅक्रमेंटोमध्ये आलो. तर, सॅक्रमेंटो परिसरात २००१ पासून राहत असलो तरी मराठी मंडळाशी ओळख तशी उशीराच झाली, साधारण २०११ मध्ये. सुरुवातीची २ - ३ वर्षे फक्त सभासद व गर्दीतला प्रेक्षक, पुढे २ - ३ वर्षे दिवाळी कार्यक्रमांत मुलाचा सहभाग, नंतर स्वयंसेवक म्हणून सहभाग. ह्या सर्व सहभागामागे कारण म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रमांची आवड व मित्रपरिवारामध्ये वाढ. २०१७ मध्ये तर कार्यकारिणीवर सहसचिव म्हणून जबाबदारी स्विकारली होती. आता ह्याला तुम्ही धाडस म्हणा, किंवा अजून काही पण माझ्यासाठी हे शक्य झाले ते मित्रांच्या उत्तेजनानेच (हो त्या वर सांगितलेल्या "मित्रपरिवारामध्ये वाढ" मधील मित्रच....तू जा रे समिती वर...काही नसते,,,एकदम सोप्पे असते जमेल तुला.. वगैरे वगैरे). असो, तर कार्यकारिणीवरचे काम एकदम सोप्पे नसले तरी खूप कठीणही नसते, आणि मी ह्या अनुभवाचा चांगला आनंद घेतला. तुम्हा सर्वांनी एकदा तो आनंद घेतलाच पाहिजे...काही नसते..एकदम सोप्पे असते...जमेल तुम्हाला...

तर, ह्या वर्षी कार्यकारिणीवर येण्याचे मुख्य कारण म्हणजे श्री. उमेशदादा जाधव ह्यांची मंडळ कार्यकारिणीच्या आयोजनाबाबत असलेली द्रुष्टी. खरंतर, जेव्हा उमेशदादांनी त्यांच्या मनातील कल्पना सांगायला सुरुवात केली, तेव्हा त्यांना गीतकार आनंद बक्षी ह्यांच्या ओळी सांगाव्याश्या वाटत होत्या,

तेरी ज़ुबां पे है ज़िक्र सितारों का
तेरे लबों पे है नाम बहारों का
पर तेरे दामन में काँटे हैं गुलाब नहीं

पण शेवटी उमेशदादा, हे सुध्दा त्या वर सांगितलेल्या मित्र परिवारातलेच असल्याने त्यांनी मला पटवून दिलेच...काही नसते रे...एकदम सोप्पे असते...जमेल आपल्याला.

तर आता त्या सर्व कल्पना प्रत्यक्षात यशस्वीपणे साकार करण्यासाठी आपल्या सर्वांचा सहयोग मिळत राहील अशी आशा आहे.

अभिरुची मध्ये ही आमची ओळख प्रकाशित करणाऱ्या संपादिका हिमानी यांचे आभार, तसेच आमच्या छंदांबाबत न विचारल्याबद्दल विशेष आभार ☺

धन्यवाद ,



**संदीप बिडये**
**अध्यक्ष, मराठी मंडळ सॅक्रमेंटो २०२०-२१**

# कार्यकारिणी ओळख : सचिव

नमस्कार मंडळी,

मी उमेश जाधव, रोझविल गावात पत्नी पूनम आणि २ मुलांसोबत (अभिषेक आणि पूजा) राहतो. सॅक्रमेंटो ला मी माझं अमेरिकेतलं "मूळ गाव" मानतो, कारण माझी अमेरिकेतील वारी इथेच १९९३ मध्ये सुरु झाली आणि पूनम सुद्धा इथेच प्रथम आली. ४ जुलै १९९३, अजूनही तो दिवस मला पूर्ण पणे आठवतो. मुंबई सारख्या गजबजलेल्या शहरा मधून सॅक्रमेंटो च १९९३ मधलं "चिल" जीवन पाहून मला जरा चुकल्या चुकल्या सारखं झालं होत हे नक्कीच. त्या काळात रोजवील म्हणजे गावाच्या बाहेर जिथे गाड्या मिळतात आणि जिथे दर वर्षी पावसाळ्यात आपल्या मुंबई सारखं पाणी तुंबायचं आणि लोकांच्या घरात जायचं ही त्याची ओळख. त्या काळात खूप मित्र जमवले आणि त्यातले बरेचसे अजूनही सॅक्रमेंटो आणि परिसरात राहतात, आणि म्हणूनच जेंव्हा २०११ मध्ये परत सॅक्रमेंटो ला यायची संधी मिळाली तेंव्हा मला अगदी घरी परत आल्या सारखं वाटलं.

सॅक्रमेंटो शिवाय मी लॉस अँजेल्स मध्ये १० वर्ष राहिलो, जिथे माझ्या- पूनम च्या अनेक आठवणी, अभि व पूजा यांचे आमच्या आयुष्यात आगमन आणि त्या बरोबर येणारे असंख्य अनुभव जोडले आहेत. लॉस अँजेल्स जरी मोठं असल तरी तिथेही बऱ्याच मित्रांशी आयुष्यभराची नाती आणि महाराष्ट्र मंडळ बरोबर काम करण्याची मजा, खूप सुख देऊन गेली त्या नंतर मिशीगन मधील ओकेमोस या गावात ५ वर्ष, आणि तिथल्या मराठी कुटुंबांसोबतचे ऋणानुबंध म्हणजे अगदी स्वर्गात झालेली मैत्री ! म्हणजे अगदी देवाने मुद्दामून शोधलेली, एकाच विचारांची, मिश्किल स्वभावाची, सगळ्यांची मुलं अगदी एकमेकांच्या जवळची आणि आई-बाबांची मैत्री पुढच्या पिढीत तशीच किंवा किंबुहना जास्तच पुढे घेऊन जाणारी देवाने केली योजना !!! माझ्या मुलांचा जन्म जरी लॉस अँजेल्स मध्ये झाला असला तरी त्यांना घडवलं मिशीगन मधील ओकेमोस गावाने.

जेंव्हा मिशीगन सोडलं तेंव्हा डोळ्यात खूप पाणी आलं होत. सॅक्रमेंटो मध्ये कसं काय परत सेटल होणार हा मोठा प्रश्न होता. बरेचसे जुने मित्र अजून सॅक्रमेंटो मध्ये होते पण जो लळा लॉस अँजेल्स आणि मिशिगन ने मराठी माणसांचा लावला होता आणि जी आपल्या मराठी संस्कृती बरोबरची नाळ परत जुळली होती तिचं काय होणार हा भला मोठा प्रश्न होता. पण हळू हळू इथल्या मराठी कुटुंबांशी ओळख झाली आणि मग इथल्या मराठी मंडळाबरोबर परिचय झाला आणि वाढत गेला. पूनमने या बाबतीत खूप पुढाकार घेतला आणि तिच्या मुळे माझ्या पण ओळखी झाल्या. अगदी जीवाला जीव लावणारी, एकमेकांची तेवढीच मस्करी करणारी पण पाहिजे तेंव्हा मदतीला धावून येणारी लोक आहेत आपली !!! आता मला परत 'सॅक्रमेंटोचा' असल्यासारख वाटत.

या वर्षी, कार्यकारणी वर येण्याचं मुख्य कारण म्हणजे, जे बीज २००५ साली आपल्या कॉम्युनिटी मधील काही दिग्गज लोकांनी लावलं होत त्याचं आता मोठ्या वटवृक्षात रूपांतर झालं आहे. बरीच नवीन नवीन कुटुंब या परिसरात आली आहेत आणि कार्यकारिणीच्या निरनिराळ्या प्रोग्रॅम्स ना उत्स्फूर्त पणे प्रतिसाद पण देत आहेत. तसा माझा आणि कलेचा दूर दूर पर्यंत काही संबंध नाही, पण या मंडळाच्या भरभराटीत थोडी मातीची भर घालावी आणि या वटवृक्षाची जोपासना कशा प्रकारे करता येईल ज्याने हा वटवृक्ष पुढची वर्षानुवर्षे असाच टिकून राहील आणि आपली संस्कृती जपत राहील, हा प्रयत्न आणि म्हणून हे धाडस. विचार केला कि ही महाराष्ट्राची संस्कृती जपण्याची संधी संदीप बिडये भाऊ यांच्या धडाडीच्या नेतृत्त्वाखाली, धर्मराज सतीश आडेट्टीवार यांच्या सारख्या अर्थशास्त्रतज्ञा बरोबर, तसेच सुजय रणदिवे आणि भगवती उपाध्ये , या उभरत्या इंटर्न्स च्या बरोबर काम करण्याची संधी परत कधी मिळणार? आणि काही चुकलंच तर मोठ्या मनाने माफ करणारे तुम्ही सर्व तर आहातच !प्लॅन्स तर खूप मोठे होते, पण या वर्षी, कोरोना व्हायरसने आमच्या उत्साहावर जरा पाणी फेरल असलं तरी "आम्ही पुन्हा येणार आणि जरूर येणार" आणि तुमच्या सहभागाची आणि सहकार्याची अशीच साथ मिळेल हि अपेक्षा.

धन्यवाद ,



**-उमेश जाधव**
**सचिव, मराठी मंडळ सॅक्रमेंटो २०२०-२१**

# कार्यकारिणी ओळख : **खजिनदार**

नमस्कार मंडळी,

मी सतीश आडेट्टीवार, फॉल्सम गावात पत्नी वैशाली आणि मुलगी आयुषी सोबत राहतो. खरंतर अमेरिकेतील सध्याच्या वास्तव्यास आम्ही आमचा दुसरा डाव म्हणजे "सेकंड इंनिंग्स" समजतो. त्यामागची गोष्ट थोडक्यात सांगतो. मी एक "माहिती तंत्रज्ञान व्यावसायिक (IT प्रोफेशनल)" म्हणून अमेरिकेत १९९३ साली आलो. अमेरिकेतील पूर्व ते पश्चिम किनारपट्टीमधील विविध ३ राज्यांमध्ये काम करण्याची संधी मला मिळाली आणि शेवटी १९९६ मध्ये बे एरियाला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. बे एरिया मध्ये आम्ही खरंच विलक्षण क्षणांचा आनंद घेतला, विविध क्षेत्रातील खूप असे मित्र जमवले ज्यांना आम्ही विस्तारित कुटुंबच मानतो. काही प्रेरणादायी कुटुंबांनी वेळोवेळी बर्याच गोष्टी शिकवल्या, काहीनी आम्हाला त्यांचे आयुष्यभराचे सोबती बनवले, तर काही आमच्या ह्या जिवनप्रवासातले हवे हवेसे वाटणारे सह-प्रवासी बनले. असा हा आमचा अमेरिकेतील पहिला डाव २००७ साली संपला जेव्हा आम्ही ठरवले कि पुण्याला परत जायचे. नंतर, भारतातील ७ स्मरणीय वर्षांनंतर, आम्ही २०१३ साली "बृहन सॅक्रमेंटो" परिसरात आमचा दुसरा डाव खेळायला आलो आणि आता वेळ होती ती पुन्हा एकदा मित्रांचे विस्तारित कुटुंब नव्याने बनवायची.

मराठी मंडळ सॅक्रमेंटो म्हणजे आमच्यासाठी हृदयाची हाक होती. बे एरिया मध्ये आम्ही मराठी मंडळाच्या बऱ्याच कार्यक्रमांमध्ये सहभागी झाली असलो तरीही हीच वेळ होती मराठी मंडळ सॅक्रमेंटोच्या उपक्रमांमध्ये खूप जवळून सहभागी होण्याची. वैशालीने पुण्यात असताना बऱ्याच मोठ्या कार्यक्रमांचे व्यवस्थापन केले होते, आणि ह्या पार्श्वभूमीवर मंडळाचे तेव्हाचे अध्यक्ष विक्रांत सावंत ह्यांनी वैशालीचे नाव २०१४ सालच्या सह-सचिव पदासाठी जाहीर केले. ह्या संधीमुळे एक सभासद म्हणून मंडळाच्या जबाबदारीची अजून जाणीव करून दिली. तेव्हापासून मी नेहमीच मंडळासाठी एक स्वयंसेवक म्हणून सक्रिय होतो, परंतु आता वेळ आली होती ती ह्या पलीकडे जाऊन जबाबदारी उचलण्याची, म्हणूनच २०२० च्या कार्यकारिणीवर खजिनदार ह्या पदाचा भार स्वीकारला. अत्यंत अनुभवी व सामाजिक कार्याला आपापल्या परीने समर्पित असलेले उमेश जाधव, संदीप बिडये यांच्या भागीदारीत आणि सुजय रणदिवे, भगवती उपाध्ये ह्यांच्यासोबत नव्याने फुलणाऱ्या मैत्रीमुळे, हि संधी मिळाल्याने मला खरंच खूप धन्य वाटत आहे.

असे बोलले जाते कि "There is no higher religion than community service. To work for the common good is the greatest creed." तेव्हा, हेच तत्वज्ञान मनात ठेवून, आपल्या मराठी मंडळाच्या, समुदायाच्या भल्यासाठी सर्वोत्तम काम करण्याची इच्छा आणि ह्या प्रवासात स्वताबद्दल अजून काही शिकण्याची संधी, ह्या सर्व गोष्टीमुळे हा एक रोमांचक प्रवास होणार हे नक्की. शेवटी, स्वतःला शोधण्याचा उत्तम मार्ग म्हणजे स्वतःला इतरांच्या सेवेत गमावणे.

आपल्या सर्वांचा पाठिंबा आणि ह्या जबाबदारीचा अधिकाधिक सदुपयोग व्हावा ह्यासाठी आपले मार्गदर्शन दोन्ही अपेक्षित आहे. ह्या संधीबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

धन्यवाद!



**-सतीश आडेट्टीवार**

**खजिनदार , मराठी मंडळ सॅक्रमेंटो २०२०-२१**

# कार्यकारिणी ओळख : सहसचिव

समस्त वाचकांना सप्रेम नमस्कार,

बरेच दिवस विचार चालू होत होता कि, अनायसे शेल्टर-एट -साईटचे आदेश आलेच आहेत तर, 'विश्वाची-उत्पत्ती', 'स्वतः मधल्या स्व चा शोध' अश्या गंभीर विषयाचा विचार करायला घ्यावाच!

पूर्णत्व (ईश्वर) ज्याप्रमाणे अपूर्णाला (भक्त-मनुष्याला) स्वतःकडे येण्याचे मार्ग स्वतःच दाखवत असत, अगदी त्याचप्रमाणे मला संदीप बिडये (आमचे माननीय, आदर्श, मराठी मंडळ सॅक्रामेंटो प्रमुख) ह्यांचा निरोप आला कि स्वतःची ओळखपर असा एक लेख लिहून द्यायचा आहे. खूप विचारांती पण काही सुचेना आणि तेवढ्यात कल्पना सुचली की नाहीतरी स्वतःचा शोध वगैरे घेण्याचा विचार चालूच होता तेव्हा ही उत्तम संधी आहे त्या विचारला वाचा फोडण्याची!

स्वभावाने आणि व्यवसायाने मुळात मी शास्त्रज्ञ असल्यामुळे असेल कदाचित, पण प्रत्येक गोष्ट तिच्या मुळाशी जाऊन समजून घेण्याचे आणि विद्या-ज्ञानाची आवड आणि अनुभव असल्याने ते तेवढयाच मुळात जाऊन शिकवण्याच्या कळा (कृपया येथे अंगी ना-ना कळा ह्या अर्थाचा बोध घेऊ नये) अंगी बाळगल्यामुळे पार हिग्स-बोसॉन पार्टीकल पासून स्वतःची ओळख लिहायला सुरुवात करणारच होते पण मग माझ्यातली शास्त्रज्ञ आवरती घेऊन व्यक्ती विषयक माहिती लिहायला घेतली.
(असो, नमनाला घडा भर तेल नको!).

तर मी भगवती विश्वनाथ जालनापूरकर आणि विवाहोत्तर भगवती कौस्तुभ उपाध्ये! माझा अमेरिकेतला प्रवास 'फॉल्सम', सॅक्रामेंटो इथे २०१९ सालच्या एप्रिल मध्ये सुरु झाला तो माझे पती कौस्तुभ उपाध्ये ह्यांच्या सोबत. २०१९ च्या जानेवारी मध्ये एक भेट आणि ४ दिवस दूरध्वनी वरचा संपर्क ह्या जोरावर आम्ही विवाह बंधनात अडकण्याचं धाडस केलं आणि विचारांची झालेली जुळवणूक आणि स्वाभावांमधली परस्पर-पूरक वृत्ती ह्या योगातून आता सुखी संसार चालू आहे.

माझं मूळ जोडलेलं आहे ते थेट महाराष्ट्रातल्या वारकरी सांप्रदायाशी, घरी पिढ्यान-पिढ्या चालत आलेली गुरु-परंपरा, ज्ञानेश्वरी, हरिपाठ, आणि भगवद-गीते चे नित्य पाठांतर, स्वतःच्या आई वडिलांचाच गुरु-उपदेश घेऊन त्यांच्या आज्ञेचे पालन करणारे आई, वडील आणि वयाने लहान असून वेळोवेळी आधार बनलेला धाकटा भाऊ अश्या अत्यंत प्रेमळ, आणि सात्त्विक वातावरणात संपूर्ण लहानपण गेल्याच आठवत. आज हि पंढरपूर येथे, नामदेव-पायरी जवळ वाड-वडिलांच्या शिकवणीची आठवण करून देत जूना वाडा तग धरून उभा आहे, तर बार्शी (सोलापूर) येथे समाधी संस्थान आज हि गुरु-मंत्रातल्या तत्त्वांचा पुनः-उच्चार करत आहे.
माझं पदवी-शिक्षण औरंगाबाद येथे झालं तर, पदवीउत्तर शिक्षण हे शिष्यवृत्ती समवेत नेदर्लंड्स इथे संपूर्ण झालं आणि सध्या सॅन- फ्रँसिस्को येथे कार्यरत आहे. मराठी मंडळ हा नक्कीच माझ्या जिव्हाळयाचा विषय म्हणावा लागेल. हे असं का? अस विचार केला तर मला आठवतो तो दिवस जेव्हा मी लग्न करून पहिल्यांदा 'फॉल्सम' येथे आले. एअरपोर्टहून घरी आल्यावर माझ्या स्वागताला हजार होती ती म्हणजे 'फॉल्सम' मधली माझ्या पतींची आणि आता माझी अशी आप्तेष्ट मंडळी. साग्र-संगीत ओवाळून, उखाणा घ्यायला लावून प्रेमाने आपल्यात सामावून घेणारी सर्व मंडळी, इतकच नव्हे तर त्याही नंतर, आग्रहाने घरी बोलावून, आपुलकीने कौतुक करणारी समस्त मित्रमंडळी! अर्थात मी भारावले होते, घरची आठवण वगैरे तर लांबच पण आता अगदी थोडयाश्या काळातच हे च माझं घर आहे असं वाटायला कारणीभूत हीच सर्व आहे.
चार प्रेमाची माणसं एकत्र यायची ती वेगवेगळ्या कारणाने येत असावीत पण, माझ्यासाठी मात्र मराठी मंडळ हे निमित्त ठरलं आणि आता हे आयुष्यभर सुखद आठवण बनून माझ्या सोबत राहणार!

२०२० ते २०२१ च्या मराठी मंडळ सॅक्रामेंटो मध्ये मी सह-सचिव (joint-secretary) म्हणून उमेशजींच्या हाताखाली काम करण्याची जबाबदारी स्वीकारली. त्यांच्यातल्या सकारात्मक ऊर्जेचा स्रोत मला अजून उमगलेला नसला तरीही त्यांच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचा पुरेपूर प्रयत्न असाच चालू राहील अशी प्रार्थना. मंडळाच्या निमिताने समाजाच्या ऋणाची परतफेड करण्याची हि संधी मला दिल्याबद्दल मी उमेश जाधव, संदीप बिडये, सतिश आडेट्टीवार, आणि सुजय रणदिवे ह्यांची कायम ऋणी राहीन!



**-भगवती उपाध्ये**

**सहसचिव, मराठी मंडळ सॅक्रमेंटो २०२०-२१**

# कार्यकारिणी ओळख : **सहखजिनदार**

नमस्कार मंडळी,

मी सुजय रणदिवे. मी सॅक्रमेंटोमध्ये माझी पत्नी दीपिका व मुलगा अथर्व यांच्याबरोबर राहतो. वयाच्या चाळिशीनंतर अमेरिकेमध्ये स्थायिक होण्याचा निर्णय चूक कि बरोबर अशी दुविधा मनात घेऊन २०१५ साली आम्ही फॉल्सम मध्ये दाखल झालो.

मूळचे आम्ही ठाणेकर. २००८ साली नोकरी निमित्ताने बंगलोर येथे गेलो आणि त्यानंतर २०१५ मध्ये अमेरिकेत आलो. २०१६ आणि २०१६ मध्ये मराठी मंडळ सॅक्रमेंटोचे काही सदस्य आणि इथल्या मराठी कुटुंबाशी ओळख झाली. २-३ वर्षात त्या ओळखीचे घनिष्ट मैत्रीत रूपांतर कधी झाले कळलेच नाही. त्यामुळे आपल्याला इथे येऊन फक्त पाचच वर्षे झाली आहेत असं अजिबात वाटत नाही. २०१९ मध्ये मराठी मंडळ सॅक्रमेंटोचे सभासद असताना आपणही काहीतरी समाजकार्यात भाग घ्यावा असे वाटू लागले, एक आवड निर्माण झाली आणि त्यानंतर मंडळात स्वयंसेवक म्हणून काम करू लागलो. ह्या वर्षी उमेश जाधव याने कार्यकारिणी वर येणार का अस विचारताच मी लगेचच होकार दिला. इथल्या मराठी कुटुंबांसाठी, समाजासाठी काहीतरी करण्याची संधी मिळाल्याचा मला खूप आनंद होत आहे.

सध्या आपणा सगळ्यांवरच आलेल्या ह्या COVID19 संकटामुळे हि संधी जरा लांबली आहे. पण या परिस्थितीतून आपण सर्व सहीसलामत बाहेर पडताच आपल्यासाठी सांस्कृतिक मनोरंजनाचे तसेच अनेकविध उपक्रम घेऊन आम्ही नक्कीच येऊ अशी खात्री आहे. तोपर्यंत तुम्ही सर्वांनी काळजी घ्या, स्वस्थ रहा!

धन्यवाद!



**-सुजय रणदिवे**

**सहखजिनदार, मराठी मंडळ सॅक्रमेंटो २०२०-२१**

# हृदयावर कोरले गेलेले ठसे

नुकतेच माझ्या मुलाने वाचायला दिलेले गार्थ स्टाईन यांनी लिहलेले 'द आर्ट ऑफ रेसिंग इन द रेन' पुस्तक मी वाचले आणि त्यानंतर लवकरच त्यावर काढलेला त्याच नावाचा सिनेमाही बघितला. केव्हिन कोस्टनरच्या आवाजातील एन्झोला ऐकताना खूप वेगवेगळ्या भावनांच्या चढउतारांवरून विचारांची गाडी फिरत होती. एन्झोची जीवनकहाणी त्याच्या हुशार, विनोदी आणि तत्वज्ञानी भाषेतून ऐकताना आणि पाहताना माझ्या जीवनातल्या अनेक पाळीव श्वानांच्या आठवणींनी मन भरून गेले. हो, एन्झो हा एक पाळलेला गोल्डन रिट्रिव्हर कुत्रा आहे आणि तो त्याची कहाणी कशी सांगतो ते श्वानप्रेमी व्यक्तींनी पहायलाच हवे.

आमच्या घरातला मला आठवणारा पहिला पाळलेला कुत्रा म्हणजे टॉमी. मी साधारण सात आठ वर्षाची होते. आम्ही तेंव्हा मोठ्या घरी राहत होतो. आजी, आजोबा, काका, काकू, आत्या आणि चुलत भावंडे अशांनी भरलेले घर होते ते. टॉमीला कधी घरी आणला हे नाही आठवत आणि त्याची ब्रीड कोणती होती तेही माहित नाही. बहुतेक गावठी असावा. छान, उंचापुरा, सोनेरी आणि करडा अशा मिश्र रंगाचा होता. तो कधीही बांधलेला नसायचा. त्याची बसण्याची आवडती जागा म्हणजे बाहेरच्या खोलीच्या जिन्याच्या लँडिंगची प्रशस्त पायरी. त्यासमोर मोठी खिडकी होती जिथून तो येणाऱ्या जाणाऱ्या लोकांवर नजर ठेऊ शके. आम्हा सर्व चुलत भावंडाना टॉमीचा खूप लळा होता. त्याच्याबद्दल आम्ही बरीच चर्चा करत असू. जिन्यावरून धडाधड चढता उतरताना त्याला लागू नये याची नकळत काळजी घेत असू. पुढे काही वर्षांनी आम्ही माझ्या बाबांनी बांधून घेतलेल्या नव्या घरात राहायला गेलो. टॉमीला अचानक आम्ही कुठे गेलो हे समजेना. सुरुवातीला आम्ही सारखे संध्याकाळी मोठ्या घरी येत असू. परत जाताना टांग्यानी घरी जात असू. तेंव्हा मिरजेत रिक्षा नव्हत्या. आम्ही टांग्यात बसलो की टॉमीही आमच्या बरोबर टांग्याच्या पाठी येत असे. आम्ही भावंडे खूप कुतूहलाने त्याच्याकडे पाहत राहायचो, त्याला सारखे हाक मारत राहायचो. आमचे नवे घर मोठ्या घरापासून तसे लांब होते. टांग्याने १५-२० मिनिटे तरी लागायची. रस्त्यात बरीच बेवारशी कुत्री असायची. त्यांचा सामना करत तो आमच्या बरोबरीने नव्या घरी यायचा. कुत्र्यांचा एक अत्यंत महत्वाचा चांगला गुण म्हणजे ते राहत असलेल्या हद्दीचे रक्षण करणे. मग ते घर आणि त्याचे आवार असो किंवा रस्त्यावरची गल्ली असो. त्यामुळे टॉमी जेव्हा केवळ आमच्यासाठी त्याच्या राहत्या घराची हद्द सोडून इतर भटक्या कुत्र्यांच्या हद्दीत प्रवेश करायचा तेव्हा त्याला त्यांचा जोरदारपणे सामना करायला लागायचा. आता ते आठवलं की लक्षात येतं तो किती धैर्यवान होता ते. तो आला की आम्ही त्याला आवर्जून पाणी द्यायचो, त्याला खायला पोळी, भाकरी, ब्रेड असे काही द्यायचो. तो बाहेरच्या पायरीवर थोड्यावेळ बसून राहायचा आणि थोड्यावेळाने मोठ्या घराकडे जाण्यासाठी परत फिरायचा. टॉमीच्या वागण्याचा आता विचार केल्यावर त्याची आमच्यावर असलेली निष्ठा आणि प्रेम तीव्रपणे जाणवते.

नवीन घरी राहायला जाताच आम्हा मुलांचा आनंद द्विगुणित होण्याचे कारण होते एक गावठी कुत्री व तिची नुकतीच जन्मलेली पिल्ले. शहरी गजबजाटापासून दूर व इतर गावठी कुत्र्यांपासून सौंरक्षण होईल असे पाहून तिने बंगल्याच्या पाठीमागचे आवार तिच्या पिल्लांना वाढवण्यासाठी धूर्तपणे शोधले होते. घराच्या मागच्या आवारात राहणारी ती गोंडस पिल्ले पाहून त्यातले एक पिल्लू पाळण्यासाठी आम्ही भावंडानी आई-बाबांजवळ हट्ट धरला. शेवटी अगदी नाईलाजाने त्यांनी समंती दिली. खूप उत्साहाने आम्ही त्या पिल्लाचे पालन पोषण करू लागलो. तेव्हा आम्ही नुकताच 'बॉर्न फ्री' हा सिनेमा पहिला होता. त्यावरून आम्ही पिल्लाचे नाव एल्सा ठेवले. सफेद आणि सोनेरी अशा रंगाची एल्सा आम्हाला खूप आवडायची. तुळशीकट्ट्याजवळच्या पारिजातकाच्या झाडाजवळ तिला बांधलेली असायची. तिच्या हरिणाक्षी डोळ्यांनी ती टुकूटुकू पाहत राहायची. तिला झालेल्या त्वचेच्या रोगामुळे ती लवकर गेली. तिच्या जाण्यामुळे आम्ही उदास झालो होतो.



पुढे एक दिवस अगदी छोटे, जेमतेम नऊ आठवड्याचे एक अल्सेशिअन पिल्लू बाबांनी आणले. त्याचा ब्रीडर बेळगावला राहत होता. त्या काळपट, करड्या रंगाच्या पिल्लाचे नाव आम्ही जॅकी ठेवले. जॅकी दिसायला एकदम तगडा आणि शक्तिमान होता. त्याचा आवाज सुद्धा अगदी दणकट होता. येणारे जाणारे लोक आणि पोस्टमन त्याला खूप घाबरायचे. अत्यंत चांगला पहारेकरी होता जॅकी. दिवाळीच्यावेळी ऐकू येणाऱ्या फटाक्यांना मात्र तो खूप घाबरत असे, इतका की त्याने एकदा आवाजाला घाबरून आत घरात येण्यासाठी खिडकीच्या लोखंडी गजातून त्याचे डोके आत घातले आणि मग त्याला ते बाहेर काढता येईना. शेवटी गज कापल्यानंतर त्याची सुटका झाली. रोजच्या कामाच्या गडबडीत आईबाबांना जॅकीला स्वतंत्र फिरवायला एखादा दिवस वेळ मिळाला नाही तर बाबा त्याला सकाळी मोकळे सोडत असत मग तो अतिशय आनंदाने गल्लीभर उंडारून येत असे. एकदा मुन्सिपालिटीच्या लोकांनी भटक्या, बेवारशी कुत्र्यांची संख्या आटोक्यात आणण्यासाठी रस्त्याच्या कडेला टाकलेलं विषारी अन्न त्याने खाल्लं आणि विषबाधेने तो गेला.

जॅकीनंतर आमच्या घरात आली रंभा. रंभा ही तिबेट मधली ल्हासा ॲप्सो जातीची एक काळ्या व करड्या केसांची खूप गोड कुत्री होती. पशुवैद्यकीय दवाखान्यात उपचारासाठी आलेली असताना तिथल्या ओळखीच्या डॉक्टरांनी जॅकी गेल्याचे दुःख कमी करण्यासाठी ती आम्हाला दिली. तिला पाळणारे कोणी नसल्यामुळे आम्ही तिला घेऊन आलो. ती इवलीशी गोड, काळ्याभोर डोळ्यांची, तीक्ष्ण कानांची आणि झिपऱ्या केसांची कुत्री २-३ वर्षेच आमच्याबरोबर राहिली पण आम्हाला अत्यंत जीव लावून गेली.



पुढचा अत्यंत देखणा कुत्रा होता, पांढऱ्या शुभ्र, मऊमऊ केसांचा पॉमेरेनियन जातीचा मिकी. माझ्या अगदी जवळच्या मित्राचा तो कुत्रा होता. आमचे शेजारी पूर्वीच्या काळात सर्कशिच्या बिझनेसमध्ये होते जे मिकीचे ब्रीडर होते. मिकी अत्यंत हुशार, ठसकेबाज आणि उत्साही कुत्रा होता. मित्राने अतिशय मन लावून त्याला ट्रेन केले होते. शिकवलेल्या सर्व गोष्टींचे तो अगदी आज्ञाधारकपणे पालन करत असे. माझ्या लहानपणाच्या आठवणीत भारतात पाळीव कुत्री शक्यतो राखण करण्यासाठी पाळलेली असत आणि त्यामुळे ती घरात न आणता घराच्या बाहेर बांधलेली असत. माझा मित्र कुत्र्याला सतत बाहेर साखळीला बांधून ठेवण्याच्या पद्धतीचा पूर्णपणे विरोधक होता त्यामुळे त्याने मिकीला घराबाहेर न बांधण्यासाठी मुश्किलीने त्याच्या आई-वडिलांना तयार केले. स्वयंपाघर व जेवणघरात न जाण्यासाठी मित्राने मिकीला ट्रेन केले होते. मिकीच्या हुशारीमुळे, शहाणपणामुळे आणि गोड वागण्याने त्याने सर्वांना खूपच लळा लावला होता.






पुढची तीन कुत्री जर्मन शेपर्ड जातीची होती, उंचीपुरी आणि देखणी. त्यापैकी दोन होती माझ्या मोठ्या बहिणीकडे आणि एक होता माझ्या नणंदेकडे. तिघांचीही नावे रेक्स होती. प्रत्येकाची वेगळी लकब होती. पहिला रेक्स जेवढा कडक आणि दरारा ठेवणारा होता तेवढाच प्रेमळ होता. दुसरा रेक्स अत्यंत खेळकर आणि निर्मळ होता. ताईच्या आवारात एक छोटासा बांधलेला तलाव आहे ज्यात तिने कमळे लावली आहेत आणि त्यात मासेही आहेत. तिथे एक बेडूक येत असे तो रेक्सला खूप आवडायचा. बेडकाकडे बघत एका विशिष्ट प्रकारे भुंकत तो त्याच्याशी संवाद साधत असे. नणंदेकडचा रेक्स अतिशय खोडकर होता. ते एअरफोर्स स्टेशनमधे




रहात असल्याने तो बरेचदा आसपासच्या आवारात मोकळा फिरत असे. मांजर आणि कोंबडी दिसली की घराबाहेर धूम ठोकून त्यांचा पाठलाग करायचा. एका चपट्या फरशीच्या तुकड्याबरोबर तो खूप चेव येऊन खेळत राहायचा. सकाळी प्रत्येकाच्या खोलीत जाऊन सगळ्यांना आपलं गारगार नाक लावून उठवायला त्याला खूप आवडायचं.

दर वर्षी होणाऱ्या आमच्या भारताच्या ट्रिपमुळे आणि आमच्या मनापासूनच्या श्वानप्रेमामुळे आमचं त्यांच्याशी खूप छान रिलेशन होतं. वर्षभर भेट झाली नाही तरी ते कधी आम्हाला विसरायचे नाहीत. भारतात जाताना जेवढं जवळच्या नातेवाईकांना भेटण्याचं आकर्षण असायचं तेवढच या कुत्र्यांना भेटायचं असायचं. सध्या माझ्या बहिणीकडे असलेली हुशार राखणदार लाडी आणि भावाकडे असलेली दंगा करणारी एल्सा आम्ही भारतात गेल्यावर त्यांना भेटलो की आनंदाने शेपूट हलवून आमचे गेल्यागेल्या स्वागत करतात.

मुले ४थी आणि ६वीला होती तेव्हा आमचा पहिला लॅब्रॉडोर कुत्रा राजा आमच्याकडे आला. अमेरिकेत राहायला आल्यानंतर घेतलेला पहिला कुत्रा असल्यामुळे आम्ही सर्व कुटुंबीय अत्यंत प्रेमाने आणि आवडीने त्याची काळजी घेण्यासाठी तत्पर झालो. मुलांचा अनेक दिवसांपासूनचा श्वानपालनाचा हट्ट शेवटी खरा झाल्यामुळे ती सतत राजाच्या मागेच असायची आणि मिकीची मनापासून उत्तम काळजी घेणारा माझा मित्रच माझा नवरा असल्याने राजाच्या पालनपोषणाच्या बाबतीत मी पूर्णपणे निःशंक होते.



अतिशय गोंडस, सॅटीनसारख्या मऊ आणि चमकणाऱ्या केसाचा काळाभोर राजा आमच्या चौघांचा जीव आणि प्राण बनला. नऊ आठवड्यापासून १५ वर्षाचा वाढदिवस होईपर्यंत त्याने त्याच्या प्रेमळ, समाधानी आणि शांत स्वभावाने आम्हाला खूप काही शिकवलं. जीवनात होणारी कुठलीही नवी गोष्ट कशी सहजरित्या स्वीकार करायची हे मी राजाकडून शिकले. तो दहा वर्षाचा असताना घरी राहायला आलेल्या नव्या पाहुणीला त्यानं आनंदानं आपलं मानलं. नऊ आठवड्याची लहानगी रेवा सारखी त्याच्याच भोवती असायची. राजाचे कान, नाक, तोंड चाटून त्याला खेळण्यासाठी मागे लागायची. त्याला खूपदा त्याचा त्रास होत असलेला कळत असे पण त्याच्यासारख्याच दिसणाऱ्या त्या

लॅब्रॉडोर पिल्लाला तो खूप सहनशीलता दाखवत असे. राजाच्या प्रेमळ सानिध्यात राहून रेवाही खूप शिकली. राजा कुणाशीही दोस्ती करत असे. भांडण करणे त्याच्या स्वभावात नव्हते. चालायला जाताना दिसणाऱ्या कुठल्याही कुत्र्यावर तो कधीच भुंकला नाही उलट त्यांच्याबरोबरचे त्याचे वर्तन अत्यंत मित्रत्वाचे असे.







आमच्या सगळ्या मित्रपरिवाराबरोबर दोस्ती करणारी रेवा मात्र स्वतःला जपून इतर कुत्र्यांशी मैत्री करते. तिला पटेपर्यंत ती त्यांच्याजवळ जात नाही म्हणजे नाही. शंका आल्यास कुस्ती खेळायला नेहमी तयार आणि दुसऱ्या कुत्र्याचे वर्तन न आवडल्यास त्याला चारीमुंड्या चित करण्यास ती मुळीचच कमी पडत नाही. 'मी टू मुव्हमेंट' ला जबरदस्त साथ देणारी रेवा अत्यंत चांगली खेळाडू आहे. चेंडू पकडण्यासाठी ती विजेच्या वेगाने धावत जाते. चालायला बाहेर पडलं की झुडपात लपलेल्या चेंडूचा वास तिला दूरवरून कळतो. जवळ गेल्यावर बरोबर ती तो शोधून काढते. कधी कधी दोन, तीन चेंडू मिळतात. त्या सगळ्यांना स्वतःच्या तोंडात धरून घरी आणते. तीन तीन चेंडू तोंडात पकडून चालताना तिला त्रास होत असतो पण आम्ही ते आमच्या हातात धरलेले तिला अजिबात चालत नाही. पाणी रेवाला खूप आवडते. फॉलसम तळ्यावर चालायला गेलो की झाली हिची गडबड सुरु. महत्वाची मिटिंग असल्यासारखी जोरजोरात चालायला लागते. पाण्याजवळ गेल्यावर सुसाट धावत पाण्यात उतरते.





मग तिच्यासाठी एक काठी शोधायची आणि ती पाण्यात फेकायची, मग रेवाबाई माशासारख्या पोहत ती लांबवर तरंगणारी काठी घेऊन येतात, मग तोच खेळ आपल्यास कंटाळा येईपर्यंत खेळत रहायचा. तिला त्याचा कंटाळा बिलकुल येत नाही. मन भरल्याशिवाय ती पाण्यातून निघत नाही. आमच्या घरी रेवाने शोधलेल्या चेंडूंचा आणि काठ्यांचा ढीग आहे. एकदा मी तिचे चेंडू दोन पिशव्यांभरून देण्यासाठी गराजमधे काढून ठेवले तर ही त्या पिशव्यांजवळ जाऊन बसली आणि त्या आत आणेंपर्यंत तिथून हलली नाही. राजा गेल्यानंतर थोडीशी सैरभैर होऊन ती त्याची वाट पहात असे. पण त्याचे काही विशिष्ठ स्वभावविशेष तो तिच्याजवळ सोडून गेला आहे असे बऱ्याचदा वाटते. तिच्या वागण्यात खूप वेळा राजा भेटतो आणि मग मन आनंदते. राजा आणि रेवानी आमच्या कुटुंबाला जे काही दिलं आहे आणि शिकवलं आहे ते लिहायला शब्द अपुरे आहेत.



अडीच वर्षांपूर्वी आमच्या जीवनात आणखी एका पिटुकल्या पिल्लाचा प्रवेश झाला. डॉग शेल्टरमधून जेव्हा मुलांनी तिला त्यांच्या घरी आणले तेव्हा मेरा खूपच चिकित्सक, चिंताखोर आणि घाबरट होती. शेल्टरमध्ये येण्याआधी मिळालेल्या उपेक्षित वागणुकीमुळे घरातल्यांच्या प्रेमावर विश्वास ठेवायला तिला खूप वेळ लागला. मुलांनी तिला हळुवार मायेने वाढवले आणि आता मात्र ती त्यांच्या घरात एकदम रुळली आहे.

प्रत्येक गोष्टीचे अतिशय कुतूहल असलेली मेरा खूपच स्वतंत्र विचारांची आहे. तिची ब्रीड मिश्र असल्यामुळे वेगवेगळ्या प्रकारच्या जातींच्या कुत्र्यांचे गुण तिच्यामध्ये आढळतात. शेतावर मेंढ्यांच्या रखवालीसाठी असलेल्या शीपडॉग जातीचे स्वभावविशेष तिच्यामध्ये प्रामुख्याने दिसतात. आम्ही सगळे जेव्हा एकत्र असतो तेव्हा तिला खूप आनंद झालेला असतो. सगळे फॅमिली रूममध्ये गप्पा मारत असले की ती शांत झोपते. वेगवेगळ्या खोल्यांमध्ये आम्ही दिसलो की सर्वांवर नजर ठेवण्यासाठी तिला प्रत्येक खोलीतून फिरावे लागते आणि मग ती





दमून जाते. प्रत्येक खोलीत गेल्याशिवाय तिला चैन पडत नाही. मुले बाहेरगावी गेलेली असताना ती आमच्याकडे राहायला येते. रेवाच्या सानिध्यात राहायला तिला खूप आवडतं. सारखी तिच्या मागे मागे असते आणि तिच्याकडून ती अनेक गोष्टी शिकते. मला दोघींना घेऊन चालायला जायला खूप आवडते. मेराला ओले झालेले गवत दिसले की ती खुश होते आणि जोरजोरात गिरक्या घेऊ लागते. तिचा तो खेळ संपपर्यंत आम्हाला थांबून रहावं लागतं. अशा वेळी रेवा खूप सयंम ठेऊन उभी असते.

कुत्रा पाळणे अनेक लोकांना त्यांच्या कम्फर्ट झोनच्या बाहेरचे वाटते त्यामुळे ते त्या वाटेलाच जात नाहीत. पण ज्यांच्या घरी कुत्रा असतो त्यांना त्याची ममता, अनन्यभाव, प्रेम, सहचर्य आणि घरातल्या प्रत्येक माणसाला बिनशर्त स्वीकार करायची व सतत आनंद देण्याची वृत्ती इतकी भावते की तो कुत्रा त्यांच्या रोजच्या जीवनाचा अत्यंत महत्वाचा अविभाज्य घटक बनून जातो. त्याच्याशिवाय जीवन त्या लोकांसाठी कल्पनातीत असते. आमचे कुटुंबही त्याला अपवाद नाही. टॉमी पासून मेरा पर्यंत माझ्या जीवनप्रवासात भेटलेल्या या अनेक कुत्र्यांनी माझ्या हृदयावर जे कायमचे ठसे कोरले आहेत ते कधीच पुसले जाणार नाहीत.

सध्याच्या अनपेक्षितपणे आलेल्या लॉकडाऊनच्या टप्प्यावर जगताना घरातल्या पाळीव श्वानांमुळे लोकांच्या जीवनात किती सकारात्मक परिणाम होत आहेत याबद्दलच्या बातम्या रोज वाचनात येतात. कितीतरी लोकांनी कुत्रा घरी आणण्यासाठी केलेल्या मुलांच्या हट्टाला खरे करण्यासाठी पाऊले उचलली आहेत आणि त्यातून मिळणाऱ्या निर्मळ प्रेमाच्या अनुभवाने होत असलेला आनंद मनापासून व्यक्त केलेला आहे. अशा बातम्या वाचल्या की त्या लोकांसाठी आणि त्यांच्या पाळीव श्वानांसाठी खूप बरे वाटते. पाळीव श्वानांमुळे मिळणारी सुसंगत सोबत आणि निः स्वार्थ मैत्री कुठल्याही मैत्रीशी तुलना करू शकत नाही असे माझे प्रामाणिक मत आहे.



**-स्मिता कुलकर्णी**

# आयुष्यं !

आज घरातली आवरा-आवर करताना अचानक त्याचं पत्रं हातात आलं आणि स्वतःच्याही नकळत तिच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या, पोटात कालवाकालव झाली. आपण मन लावून, काहीतरी शिवणकाम करत असतो आणि मधेच बोटात सुई टोचून रक्ताचा लालबुंद थेंब टरटरुन वर येतो, तसंच काहीसं तिचं झालं. मग स्वतःचाच प्रचंड राग आला. अजूनही त्याच्या खुणा का सापडतात इथे-तिथे? मनाच्या आड, दृष्टीच्या आड केल्या गोष्टी कि वाटते संपले सगळे.. आता कधीच, कुठे, काहीच नाही गवसणार. पण आजच्यासारखी वेळ आली कि जाणवते किती संभ्रमात असतो आपण ते !

असेही त्या दोघांच्यात आठवून ओठांवर हसू फुटण्यासारखे क्षण अगदी दोन-चारच असतील पूर्ण बारा-तेरा वर्षांच्या सहजीवनात. सहजीवन!, किती सहज म्हणून जातो ना आपण हा शब्द. एकत्र राहिलं केवळ म्हणून होतं का सहजीवन? असो, जे काही होतं, ते संपून मध्ये बराच काळ लोटला होता. एकमेकांच्या समोरा-समोर आले तरी हाय-हॅलो कोरडेपणाने करण्याएवढे दोघेही सरावले होते. आपापल्या सध्याच्या आयुष्यात सुखी-समाधानी होते. तिला वाटलंही नव्हतं कि त्याच्यासाठी तिच्या मनाचा एक कोपरा अजून असा ओला होईल.. पण ओला झालेला कोपरा त्याच्याचसाठी होता का? तिने परत एकदा स्वतःच्या मनाला चाचपले. ..नाही बहुदा. सगळंच कोरडं कोरडं झाल्यावर, मनाचा दगड झाल्यावर मगच तर तिने तो निर्णय घेतला होता. तेंव्हा त्याच्या या पत्राने तिचं मन क्षणभर सुद्धा हाललं नव्हतं. कागदावरच्या त्याच्या वाकड्या-तिकड्या शब्दांवर तिची कोरडी नजर फिरली होती, तेवढीच दखल घेऊ शकली होती ती तेंव्हा. आजचं ओलावलेलं मन बहुदा तिनं तिच्या त्या भोगांना दिलेली तिलांजलीच होती....असणार...

मनातले विचार झटकून हातातले ते पत्र तिने टरा-टरा फाडून टाकले आणि पुढचा खण आवरायला घेतला...पण तिच्या कपाळावर एक अदृश्य अठी उमटून राहिली. ......मागून तो कधी आला आणि त्याने तिला मिठीत कधी भरले हे कळलेच नाही तिला. अलगद गालावर खट्याळ हसू उमटले आणि त्याचे ओठ हलकेच तिच्या कपाळावर विसावले..तेंव्हा.. कपाळावरची ती अठी तिच्याही नकळत पुसून गेली..

.. एकाच जन्माच्या दरम्यान किती प्रकारची आयुष्यं जगतो ना आपण ?



**-प्रीती देशपांडे**

# आभार

कामावरून घरी येऊन, हातात कॉफीचा वाफाळलेला कप घेऊन एकटीनेच बसायला तिला फार आवडतं. कपाभोवती ओंजळ लपेटून कॉफीचा चटक लावणारा वास आणि कपाचा गरमपणा मुरवून घेत पुस्तक वाचणे, फोनवरचे निरोप , पोस्ट्स वाचणे किंवा कधी कधी नुसतेच अंगणात बसून बाग निरखणे तिला सुखावून जाते . संध्याकाळची कामे सुरु होण्याआधीचा निवांतपणा .

आज असंच घरी आल्यावर काहीतरी मराठी वाचावं असं वाटलं. मराठी पुस्तक वाचून घरी गेल्यासारखं वाटतं . घरी म्हणजे पुण्याला. पुस्तकातला प्रत्येक शब्द जिवंत होतो आणि लाखो आठवणी दरवळतात. आज गुलजारचं पुस्तक बोलवत होतं. केव्हढी शक्ती आहे त्यांच्या प्रतिभेत ! मोजक्या, अचूक शब्दांनी शब्दचित्र रंगवतात .. कथेतली पात्र, त्यांच्या भावना आणि आजूबाजूचा माहोल शब्दांच्या चिमटीत पकडून अशा सोडून देतात की जीव चिरत जातो.

ती कॉफी आणि पुस्तक घेऊन बाहेर आली. ढगाळलेलं आभाळ , हवेत किंचित गारवा. बागेतली फुलं ऐन बहरात. जाईचा दरवळ, गुलाबाचा मोहोरलेला लालिमा , जांभुळखुळा लॅव्हेन्डर , सळसळणारी नवी पालवी,

किलबिलणारे पक्षी, वाऱ्याच्या मंद झुळका आणि येतो येतो म्हणून खुणावणारा पाऊस.

तिने एक खोलवर श्वास घेतला, कृतज्ञतेचा!



**-अमिता खरे**

# तिमिरातूनी तेजाकडे....

लक्ष दीपांच्या प्रकाशी हे चराचर न्हाऊ दे
तिमिरातूनी तेजाकडे हे विश्व अवघे जाऊ दे ।।

आज साऱ्या मानवांचे हित देवा तूच पाहे
युद्ध थोडे आगळे अन शत्रूही अदृश्य आहे
तव प्रभा सृष्टीतूनी चैतन्य होऊन वाहू दे
तिमिरातूनी तेजाकडे हे विश्व अवघे जाऊ दे ।।

सर्वकल्याणार्थ जुळती कर तुझ्या पुढती आता
यत्न जेथे तोकडे, तव कृपा होई पूर्तता
हे दयाळा, तुझी करुणा सतत सोबत राहू दे
तिमिरातूनी तेजाकडे हे विश्व अवघे जाऊ दे ।।



**-हिमानी कुलकर्णी**

# सामान्यतः विचारले जाणारे प्रश्न (FAQs)

**1. What is the benefit of membership?**
मंडळाचे सभासद व्हायचे का नाही हा खरे तर ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. सभासद होऊन व कार्यक्रमाला उपस्थित राहून मंडळाप्रती असलेली आपुलकी/स्नेह तुम्ही दाखवता. Sacramento परिसराचा परीघ मोठा असल्याने सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहणे सर्वांना शक्य होत नाही याची आम्हाला जाणीव आहे. शेवटी काय भारताच्या एका प्रांतातून आलेली फक्त भाषेमुळे जोडली गेलेली आपण मंडळी! आपण मंडळ चालवतो, एकत्र येतो, सण साजरे करतो ते कशासाठी? तर आपली संस्कृतीशी नाळ पूर्णपणे तुटू नये, आपल्या पुढच्या पिढीला ती समजावी, भाषा जमेल तितकी अवगत व्हावी किंबहुना आपलीशी वाटावी म्हणून. त्यामुळे सभासदत्वाचे पैसे देऊन मला काय मिळेल किंवा त्याचे मूल्य ("value for money") काय असे प्रश्न काहीप्रमाणात गौण ठरतात. आपले आर्थिक गणित आणि सभासदत्वाने मला काय मिळेल हे ज्याचे त्याने ठरवावे.

**2. Is $75 per adult or for the family?**

$75 Membership fee is for one adult for the Year 2/1/2020 through 1/31/2021.

**3. Is there a separate fee for kids?**

If any one adult in the family has paid the annual membership fees, then the kids in that family will not be charged separate membership fees.

**4. Is there a separate fee for seniors?**

No. There will be no separate fees for seniors. Seniors are those members of our community who are 65 and older. We want blessings from our seniors. We want them to participate in all our events, enjoy the company of our friends and family and guide the committee.
Please note that this year we are planning a program focused on Senior Citizens. We will communicate the date and logistics before 3/31/2020.

**5. Is there a separate fee for adults over 21 who do not have a full-time job?**

No. There is no separate fees for adults over 21 who do not have a full-time job. The intent of this is to encourage participation for full time students who relate themselves to Maharashtra and to make them feel at home. The intent of this is also, for those adults in our community who may genuinely need a helping hand. Please note, that this is not for those adults, where another adult in the family has a full-time job. This is a true helping hand, so please contact Umesh Jadhav @ UJ.MMSAC@GMAIL.COM or 6266647682 and we will keep the ask confidential.

**6. Do I have to take MMSAC membership if my kid is going to MMSAC Shala?**

No. However, we encourage you to take MMSAC membership as the intent of MMSAC is to get our next generation learn and continue our culture.
Please note that this year, our youth representatives, Siya Joshi and Akshaj Joshi, are actively involved in planning activities for Holi event (Sunday 3/22/2020) and they are leading Sports Day (Sunday 4/19/2020)

planning and execution – with the support of MMSAC Executive Committee. We are hoping that you become members and participate and enjoy the events planned and executed by our next generation.

**7. Is food cost included in the $75 membership? Will there be any additional cost for the MMSAC event, published in calendar of events?**

We are in the process of finalizing those details. For most recent updates on food or any specific cost for the event, please go to MMSAC for details. Our ability to provide food at no cost or any additional cost for the event, depends on what we collect as membership fees and support from our sponsors and donors, who truly want to see us grow as a community. We are sincerely hoping that you understand, why it is difficult to give a straight answer to this question. However, based on what we know today, there will be no additional cost for MMSAC members for food or event for the Holi event scheduled on 3/22/2020.

**8. If my parents are visiting from India, do I have to pay separate fees for them?**

No. We do want our parents who visit from India to experience family away from family.


**9. Where do I see a list of all the programs offered for the year?**
Please go to MMSAC for details.
In addition,
a. Please become a member and Join MMSAC members WhatsApp group
b. Please send an email to MMSAC.committee@gmail.com and get included in the MMSAC email group

**10. How do I volunteer?**
I want to Volunteer Or Please send an email to MMSAC.committee@gmail.com
Call or Text MMSAC Executive Committee members – Sandip Bidaye – (916) 432-0397 , Satish Adettiwar – (916) 673-7374 , Sujay Randive – (916) 337-2240 , Umesh Jadhav – (626) 664-7682 , Bhagwati Upadhye – (916) 513-9507

**11. I do not receive MMSAC emails?**
We are in the process of streamlining these requests. In the meantime, please send an email to MMSAC.committee@gmail.com and get included in the MMSAC email group

**12. I am new to Greater Sacramento area (Sacramento, Elk Grove, Natomas, Folsom, El Dorado Hills, Granite Bay, Roseville, Rocklin etc.) or new to MMSAC, how do I integrate and feel welcomed?**

Please reach out to any member of MMSAC Executive Committee (Q 10). MMSAC events is a great platform and provides opportunities for you to integrate with the established community. We encourage you to volunteer and participate in the programs to expediate the experience. However, we recognize that we may need to do more. We will assign a "Primary Contact" from EC to create opportunities outside the MMSAC events and EC will sincerely attempt to introduce you and make you part of our extended family, in the best possible way.





CHICAGO'S
PIZZA
With-A-Twist

sanskrit
new age indian




INCHIN'S
BAMBOO GARDEN
pan asian cuisine

RUCHI
INDIAN CUISINE



# उर्वरित कार्यक्रम कॅलेंडर



# Visit us at

www.mmsac.org

Like us on Facebook

Contact us at

mmsac.committee@gmail.com